# पालवी

अनामिका
सावंत

# पाळवी

## अनामिका सावंत

सी. ई. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय

कुंकळ्ळी, सासष्टी – गोवा

**पालवी**

अनामिका सावंत

बाळ्ळी - गोवा.

PALAVI

(Marathi : Poetry)

Anamika Pandurang Sawant

ISBN: 978-93-344-0159-2

प्रथमावृत्ती : २०२५

प्रकाशक :

प्राचार्य

प्रो. (डॉ.) ब्रह्मा ॲडविन बरेटो

सी. ई. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय

कुंकळ्ळी, सासष्टी – गोवा

४०३७०३



सर्व हक्क : अनामिका सावंत



मूल्य : १०० रुपये

प्रिय आजी,

तुझं लेकरू

पहिलं पाऊल टाकतंय

तुझ्या संस्कारांच्या छायेत

आज नव्याने फुलतंय

# मनोगत

'पालवी' हा माझा पहिला कवितासंग्रह. एक नवीन प्रवास. मनातल्या छोट्या-छोट्या भावना, अनुभव, आठवणी आणि कल्पनांना शब्दांत मांडण्याचा मी केलेला एक छोटासा प्रयत्न. या केवळ कविता नाहीत, तर माझ्या मनात दररोज उमलणाऱ्या विचारांची, भावनांची आणि निरीक्षणांची एक साक्ष आहे.

माझ्या या प्रवासाला सुरुवात झाली अगदी नकळत. काही भावना अशा असतात, ज्या मनात फार खोलवर दडलेल्या असतात. त्या शब्दांत उतरवल्यावर त्यांच्या अस्तित्वाची जाणीव होते. अशाच काही क्षणांना मी या संग्रहातून मोकळं केलं आहे.

'पालवी' म्हणजे नव्या सुरुवातीचे, आशेचे आणि उत्कटतेचे प्रतीक. आयुष्यातल्या प्रत्येक क्षणी, प्रत्येक अनुभवामध्ये एक नवी पालवी फुटते. कधी विचारांची, कधी भावनांची, तर कधी नव्या दिशेची.

या कवितासंग्रहात माझ्या मनात उमटलेल्या भावना, निसर्गाचं सौंदर्य, जीवनाच्या वाटचालीतील क्षण आणि मनाच्या गूढतेला शब्दांत गुंफण्याचा प्रयत्न मी केला आहे. या कविता म्हणजे माझ्या अंतर्मनातून अंकुरलेली पालवीच! जी तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा हा भाबडा प्रयत्न.

कधी निसर्गाच्या शांततेत, कधी मनाच्या गोंधळात, तर कधी आयुष्यातल्या साध्या प्रसंगांतून कविता साकार झाल्या. प्रत्येक ओळीत काहीसं माझंच प्रतिबिंब दडलेलं आहे. लिहिता लिहिता स्वत:च्याच भावना मला ओळखायला मिळाल्या. मीच मला सापडत गेले.

या सगळ्या प्रवासामध्ये मला सतत प्रेरणा आणि आधार दिला त्या माझ्या शिक्षका प्रा. शुभलक्ष्मी नाईक गावकर मॅडम. त्यांनी माझ्या लेखणीतला विश्वास जागवला, मला प्रोत्साहित केले आणि माझ्या शब्दांना एक दिशा दिली. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय ही 'पालवी' अंकुरली नसती.

माझ्या कुटुंबियांनी नेहमीच मला आधार व माया दिली. त्यांच्या प्रेमातूनच मी ही कला जोपासू शकले. त्यांच्या पाठिंब्यामुळे मी ही काव्य लेखनाची वाटचाल  करू शकले.

या संग्रहाचे अर्पण मी माझ्या स्वर्गवासी आजीला करते. जिला मी कधी प्रत्यक्ष पाहीले नाही. परंतु नेहमी कुटुंबियांकडून तिची थोरवी ऐकली. ती हयात नसतानाही तिचेच संस्कार माझ्या अंगी रुजले. मला जरी तिचा सहवास प्रत्यक्ष लाभला नसला तरीही तिची ऊब, तिचे अस्तित्व मी मनातून सतत अनुभवत आले आहे. माझ्या लेखणीत तिचे एक अदृश्य प्रतिबिंब मला जाणवते.

'पालवी' म्हणजे माझ्या कवितेच्या प्रवासाची साक्ष देणारा पहिला अंकुर. सृजनाच्या वाटेने टाकलेली नवी पावले.

# अनुक्रमणिका


१. हरवला का तो निसर्ग?
२. मागणं काय?
३. प्रेम
४. जन्म एका स्त्रीचा
५. पहिला पाऊस
६. चहा आणि बरंच काही
७. शिवरायांचा अभिमान
८. वळण
९. सांजवेळ
१०. आयुष्य सुंदर आहे
११. मी एकटी
१२. बाबा
१३. आई
१४. रात्र
१५. पारिजात
१६. आशेचे किरण
१७. शौर्य
१८. ऊर्मिलेची वेदना
१९. मन माझे
२०. गावाकडचा निसर्ग
२१. वेदनेची सावली
२२. निर्णय
२३. मैत्री
२४. आभास
२५. स्वर्ग गावलो
२६. रंगपंचमी
२७. राखी पौर्णिमा
२८. वसंताची किमया
२९. ती सूर्यकिरणापरी
३०. जिवनगाणे
३१. स्वप्नांची वाट
३२. माझी ताई
३३. पुढच्या वेळी
३४. मंदिर
३५. ताई
३६. सागरकिनारा
३७. सुर्यकिरण
३८. बालपण
३९. गुलाबासारखी तू
४०. सोबत सखी

## हरवला का तो निसर्ग ?

हरवला का तो निसर्ग?
जो आपण लहानपणी पाहिला होता
जिकडे तिकडे हिरवी झाडे
आणि पक्ष्यांचा किलबिलाट
कुठे गेले ते पक्षी?
जे लहानपणी आपल्याला दिसायचे
दूर कुठे तरी असायचे,
मधूर किलबिलाट करायचे
पहिल्या पावसाचा तो गार वारा
दाटलेले ते काळे नभ
सरसर येते पाऊस धारा
सगळ्यांसाठीच आनंद निराळा
पहिल्या पावसातला मातीचा सुवास
अजूनही आवडतो का कुणाला?
हरवला का तो निसर्ग जो आपण लहानपणी पाहिला होता?
रंगीबेरंगी फुलांचा दरवळलेला तो गंध
आवडतो का अजूनही माळायला केसात?
जग सारे बदलून गेले
विसरून ह्या निर्सगाला
हरवला का तो निसर्ग
जो आपण लहाणपणी अनुभवला ?

## मागणं काय ?

अंधार दाटून आले
काळे मेघ
मंद वाहतो वाऱ्याचा वेग
हळूवार आली पावसाची सर
सुगंध पसरला मातीचा धरणीवर
तृप्त झाली ती धरती माय
शेतकऱ्याला आणखी हवचं काय?
पाण्याचे साठे तुडुंब भरले
सगळ्यांसाठीच जीवन दान
प्रसन्न झाले माझे मन
अशीच फुलुदे माझी धरती माय
आणखी देवा मागणं काय ?
आणखी देवा मागणं काय ?

## प्रेम

प्रेम नक्की काय असतं ?
समजलं तर समजलं
नाहितर कोडचं असतं
कोणी म्हणतं प्रेम आंधळं असतं
तर कोणी म्हणतं प्रेम अनावर असत
तर काही जणांचे म्हणणे प्रेम एकदाचं होत असतं
पण काहीजण सांगतात प्रेम अनेकदा होतं
प्रेमाचं ह्या काहीच समजेना
पडलेले कोडे काही सुटेच ना
काही का असेना
पण हे प्रेम फार गोड असतं
ज्याने कोणी अनुभवलं
त्याला ते नक्कीच समजलं
प्रेम हा मनाचा खेळ असतो
त्यात खरा – खोटा कोणचं नसतो
प्रेमामुळे नवीन नाती जुळत जातात
नवीन प्रश्न व उत्तरे सापडतात
प्रेम नक्की काय असतं हे तर सांगता नाही येणार
तो असतो सगळ्यांचा अनोखा अनुभव
जो शब्दात मांडता येत नसतो

## जन्म एका स्त्रीचा

ती एक आई असते
ती एक बहिण असते
ती एक मैत्रिण असते
ती एक पत्नी असते
सर्व जबाबदाऱ्या ती एकटी पार पाडते
आपल्या इच्छा लपवून ठेवते
दुसऱ्यांचा विचार नेहमी करते
कितीही राग आला
तर शांत राहते
तिने नेहमी असचं राहावं का?
तिला कमी समजण्याची चूक करू नका
तिच्यातील शक्ती अजूनही
तुम्हाला जाणवली नाही
सरस्वतीच्या सोबतीने
महाकालीचे रूप घेऊन
तिला अडवणाऱ्यांना ती सोडणार नाही
आपला स्त्री जन्म
ती व्यर्थ जाऊ देणार नाही
व्यर्थ जाऊ देणार नाही

## **पहिला पाऊस**

आला आला पाऊस पहिला
वीज चमकून वारा आला
रस्त्यावरच्या पाण्याला
खळखळाट आला
सरसर पाऊस आला

शिवार सजले हिरवेगार
मोरांचा  नाच वारंवार
मुलांना कागदाच्या होडीचा
नादच फार
छत्री घेऊन बाहेर पडायला
एका पायावर तयार

शेतकरी राजा तर
घेतो सुखाचा श्वास
तरुणांच्या मनाला
प्रेमाचा आभास

आला आला हा पहिला पाऊस
भिजवायला धरणी मातेची कूस

## चहा आणि बरंच काही

सांजवेळेला पसरलेली कोवळी किरणे
खिडकीला येऊन धडकली
टेबलवरच्या चहा बिस्कीटी सोबत
दिवसभरातील गोष्टींची भेळ सजवली
थकलेल्या या मनाला
गार वाऱ्याची सोबत लाभली
निवांत घेतलेल्या विसव्याने
तुझी आठवण काढली
चहावरच्या वाफेसारखे
दुःख हे निघून जावे
साखरेसारखं सुखात विरघळून
जीवन गोड बनवावे
गरम चहाचा चटका बसेल
याची भीती तर असतेच
पण तोच चहा सांभाळून प्यायलो
तर त्याची गोडी समजते
आयुष्यातल्या थंड गरम
प्रश्नांची उत्तरे
नक्कीच एका
चहाच्या घोटाने सोडवली

## शिवरायांचा अभिमान

शिवराय म्हणजे शौर्याची शान
मराठ्यांचा ते अभिमान
सिंहासारखे पराक्रमी,
स्वराज्याचे तेजस्वी राजा

सत्य, न्यायाचा दिला संदेश
रयतेसाठी पुढे राहून
रणांगणात सिंह गर्जला
शत्रूंचाही थरकाप उडाला

स्वाभिमानाने झुंज दिली
हिंदवी स्वराज्य उभं केले
शिवरायांचे तेज अमर राहो
मराठ्यांचा गजर सदा दुमदुमो!

जय भवानी! जय शिवराय!

## वळण

चालत आले पायी
रस्ता नाका समोरचा
सुरळीत होता रस्ता
प्रकृतीने माखलेला
सुंदर वाटत होता
पुढचा हा प्रवास
जोमात चालत होते मी
घेऊन जिंकण्याची आस
पण माहित नव्हतं मला
वाढत्या वयासोबत
सुरळीत रस्त्याला वळणं येतात
वेगवेगळ्या आव्हानांनी त्या प्रकृतीत मिसळतात
एक वळण पार केलं की
येतात अनेक वळणं
अनुभवाचे गाठोडे देऊन
जीवनात चालत राहण्याची
हिंमत देऊन जातात

## सांजवेळ

सांज वेळेत मन रमते
लाल पिवळ्या रंगाने
अंगाला मंद झुळूक भासते
वाऱ्याच्या स्पर्शाने
झाडे फुले झोपी जातात
दिवसभराच्या स्फूर्तीने
पक्षी परततात
आपल्या लेकरांच्या काळजीने
सांजवेळी वेगळीच नशा
या वातावरणात मिसळते
दिवसभरात झालेली धडपड जाणवते
सांजवेळेची मजाच वेगळी असते

## आयुष्य सुंदर आहे

संधी मिळेल तुलाही, लगेच हिरमुसू नकोस
छोट्या अपयशाने, स्वतःला खचू देऊ नकोस

रात्र जरी काळोखी, तरी येईल पहाट
सहनशीलतेच्या प्रकाशाने, उजळेल तुझी वाट

वाऱ्याशी लढणारा, ताठ मानेने उभा राहतो
धीर न सोडणारा, यशाच्या शिखरावर पोहोचतो

आयुष्य खूप सुंदर आहे, फक्त पहा नव्या नजरेने,
संधी येईल तुझ्याही दारी, फक्त जग प्रयत्नाने!

## मी एकटी

खरंच मी एकटी आहे का?
एवढ्या माणसात वावरते
तरीही सतत भीती जाणवते
पण ऐकते मी सगळ्यांचे
सांगते मी सगळ्यांना
पण बोलते मी मनाचे मनाशीच
हिंमत केली काहीतरी कमावण्याची
तर सतत भिती भासते
ती गोष्ट गमावण्याची
अनेक गोष्टी पिंगा करता माझ्या मनाभोवती
का भीती वाटते मला माझ्याच विचारांची?
कदाचित कारण असावं हेच
म्हणून मी  एकटी
म्हणून मी एकटी

**बाबा**

किती प्रेम करता बाबा
तुम्ही आमच्यावर
स्वतःचं मन मारून
जीव ओवाळता लेकरांवर
तुमची काळजी कधी
समजू नाही दिली आम्हाला
डोळ्यातलं पाणी
कधी कळू नाही दिला कुणाला
आता समजतंय
तुमच्या रागामागचं प्रेम
आयुष्यात कधी तोल नको जायला
म्हणून आधीच सावरला आमचा वर्तमान
ठरवूनही नाही विसरू शकत तुमचे
थोर उपकार बाबा.

# आई

ए आई आणि किती गं करशील?
सगळ्यांसाठी किती धडपडशील
मुलांचा पसारा तू आवरणार
बाबांचा डब्बा तू बनवणार
मग स्वतःला कधी वेळ देणार?
तुझं प्रेम गं आई वेगळंच आहे
तुला समजणं कठीणच आहे
सगळ्यांची आवड बरोबर कळते
पण स्वतःला आवडेल असं कधी वागतेस?
तुझ्या काळजीमुळे आम्ही सावरलो
वेळेत तुझं ऐकलं म्हणूनच आज फुललो
तुझ्या हृदयातल्या कळा
समजतात गं मला
नेहमी देवाकडे हेच मागणं
सुखी ठेव माझ्या कुटुंबाला

## रात्र

दाटलेले हे काळे मेघ
चांदण्यांनी चमकतात
चंद्राच्या मदतीने
ही रात्र सजवतात
मंद वाहणाऱ्या वाऱ्यासोबत
ही शांतता जाणवते
थकलेले हे जग
जेव्हा निवांत झोपत
पसरलेलं हे आकाश
त्यांना सावकाश थोपटते
सर्वांची आई बनून
काळोखावर मात करायला शिकवते

## पारिजात

पारिजाताचा सडा पसरला
सुगंध सर्वत्र दरवळला
पारिजाताचा सडा पाहुनी
स्वर्गच आठवला
प्रेमाची ही खूण आहे
पारिजाताचा सडा
सर्वांचे मन मोहून घेतो
शुभ्र रंग त्याचा
नाजुक ते फुल
रात्रीच फुलते
विष्णू देवाला आवडते
म्हणून तुळशीपाशी रोवले जाते
ओंजळीत अलगद झेलूनी
उरी कायम ठेवावी
सुंदर या फुलाची जादू
साऱ्यांनी जाणून घ्यावी

## आशेचे किरण

आशेचे किरण उजळतो अंधार
मनाला देतो नवा आधार
स्वप्नांना नवी उमेद देतो
आयुष्याला नवा सूर सापडतो

कष्टांच्या वाटेवर चालताना
आशाच असते सोबतीला
तीच खरी साथ देते
तुटलेल्या स्वप्नांना जोडायला

मनातल्या वेदना असतात खोल
आशेचा प्रकाश नेहमीच अनमोल
सगळ होत जेव्हा उध्वस्त
आशाच करते सर्व दुरुस्त

तर, धरूया आशेचा हात
आणि आयुष्याला  उजळूया
आशेच्या वाटेवरूनच
स्वप्नांचे पूल पूर्ण करुया

## शौर्य

सैनिक आपुले रणवीर
देशासाठी झुंजती
सीमेवरती लढती
शत्रू सोबत सतत

खांद्यावर बंदुक डोळ्यात तीक्ष्ण नजर
तिरंग्याशिवाय त्यांना दुसरी कसलीच नाही फिकर
रात्रंदिवस जागे ते
रखवाली करतात
आपल्या जीवनाची चिंता
करणे ते नाकारतात

शौर्य आणि धैर्य यांना
दिला त्यांनी नवा आकार
सैनिकांचे जीवनच आहे
आपल्या देशाचा आधार

अशा वीरांना वंदन
मनात भरतो अभिमान
नाही कधी विसरणार
त्यांचे शौर्यच आमची शान

## उर्मिलेची वेदना

सूर्य उगवला, चंद्र मावळला
चौदा वर्षांचा काळ सरला...
प्रिया तुझी मी वाट पाहिली,
अश्रूंच्या धाग्यात रात्र विणली.

जनकपुरीची मी राजकन्या,
पण विरह आपला झाला!
संसार साजरा एकटीने केला,
नियतीने मात्र हात सोडला.

सीता-राम तुझ्या सोबत होते,
पण माझ्या डोळ्यात फक्त अश्रू होते...
रात्र कधी सरत नव्हती,
सुखाची पहाट कधीच येत नव्हती.

तू परतशील ही एकच आस,
नव्हती कुणाचीच मला साथ...
तरीही मी शांत उभी,
बनून तुझी प्रेयसी!

## मन माझे

सावलीसारखे सोबत होते,
क्षणात हरवते, कुणास ठावे?
हसण्याच्या मागे दडलेले,
दुःख कुणी ओळखेल का रे?

मनाला लागलेली ही ठेच,
कधी भरून निघेल का?
वेळ सरते, वेदना टिकते,
उत्तर त्याला मिळेल का?

## गावाकडचा निसर्ग

गावाकडची सुंदर दुनिया,
निसर्गाची जणू ही किमया!
हिरवीगार ती शेतं सारी,
डोलत जातात वाऱ्यावरी!

निळे आभाळ, ढगांचे खेळ,
मोकळ्या वाऱ्याचा अलगद मेळ!
पाखरांची गोड गाणी,
सगळीकडे गुंजती

नदीचे पाणी थंड थंड,
वाहत जाते अगदी मंद!
डोंगर, दऱ्या, मळे, माडी,
हिरवे शिवार, माती गोडी!

चंद्र रात्री चमकून हसतो,
झुळूक वारा गुपित सांगतो!
गावाकडचा निसर्ग सुंदर,
त्याची किमया एक नंबर..

## वेदनेची सावली

नशिबाच्या या खेळात
अंधार पसरला…
हातात होते जेव्हा फूल,
पदोपदी काटा रूतला

सुखाची वाट मी चालले,
वाऱ्याने तीच मिटवली
साथीदार जे होते सोबती,
वाट त्यांनीच फसवली

ओळखीचे चेहरे परके झाले,
शब्दांमध्ये विष मिसळले
सत्याचा शोध घेत होते
पण आरसेही खोटे निघाले

नशीबाचे गणित सुटत नाही,
आयुष्याची घडी बसत नाही
पाऊस सुद्धा वेदना देतो,
आणि ऊनही सावरून घेत नाही!

## निर्णय

ठेच लागली तर सावर स्वतःला
वाट भरकटली तर आवर स्वतःला
थोडे थांबा, पुन्हा उभे रहा
स्वप्नांच्या दिशेने पुढे चला

वाऱ्याने दिवा नाही विझत
संकटांसमोर माणूस नाही झुकत
मनात जर का जिद्द असेल
प्रत्येक अडथळा सहज मिटेल

निर्णय तुझा ठाम हवा
हरलो तरी प्रयत्न कायम हवा
स्वतःवर ठेव विश्वास
यश मिळेल तेव्हाच

## मैत्री

कधी सोडणार नाही तुझा हात
आपल्या मैत्रीत झळकते विश्वासाची वात
हाकेला हजर राहीन
हा शब्द आहे माझा
तुला संकटात पाहून कसा जीव रमेल माझा?
तू कधी मला पडू नाही दिलं
खंबीर उभं राहून लढायला तू शिकवलं
तुझ्या माझ्या मैत्रीची आहेच किमया न्यारी
आपली मैत्री आहेच सतत फुलणारी
सतत बहरणारी

## आभास

हा होणारा आभास
काय सांगतो काहीच समजेना
ह्या कोड्याचे उत्तर काही मिळता मिळेना
तरी का चांगलं वाटतं
ह्या कोड्यातच जगणं
उत्तरं न शोधता आभासात गुंतणं

## स्वर्ग गावलो
## (मालवणी कविता)

पावसान धरलो जोर
म्हणान कोपरो घेतलो नांगरूक
चला काढया मेरे
आणि भात घेवया पेरुक

मैनकापडाची खोळ करून
सगळी तरवो काढूक जमली
थंडगार वाऱ्याच्या मजेत
गरम चाय पिवक बसली

पावसाच्या जोरार
चढणीक इले माशे
कुल्र्याचो रस्सो खावक
पावसाचे दिवस व्हये तशे

तांदळाची भाकरी
आणि तेऱ्याचो बेत
मगे आणि काय व्हया
स्वर्गच गावलो थेट

**रंगपंचमी**

रंगांची उधळण, आनंदी सोहळा
प्रीतीचा सडा, हास्याचा मेळा

गुलाल उधळू, नवे रंग भरू
राग विसरू, मैत्री जपू

निसर्गही आज रंगला आहे
सण आपला हसरा आहे

चला मग आज नाचू गाऊ
प्रेमाचे रंग सर्वांवर उधळू!

शुभ रंगपंचमी!

**राखी पौर्णिमा**

आला सण हा राखी पौर्णिमेचा
सण आहे हा विश्वासाचा
तू दिलेल्या वचनाचा
तुझ्या बहिणीच्या रक्षणाचा

बंध हे वात्सल्याचे
रेशमी धाग्याने जोडले जाते
ज्यांच्याकडे जिव्हाळा लावणारे भाऊ असतात
त्या बहिणी खूप नशीबवान असतात

तुझ्या माझ्या नात्यातला
हा गोडवा नेहमी वाढत जावा
माझ्या भावा तू सदैव सुखाने रहावा

ज्योत ही विश्वासाची
झळकत राहो नेहमी
हीच इच्छा आहे या शुभदिनी

## वसंताची किमया

फुलांचा हसरा बहर
हिरवे गार गालिचे घरभर
सोनसळी किरणांचा स्पर्श
निसर्ग गातो प्रेमाचा हर्ष

पानगळ झाल्या वृक्षांना
नवी पालवी देई वसंत
जणू नव्या स्वप्नांची चाहूल
आली घेऊन आनंद

कोकीळ गातो गोड गाणी
फुलपाखरंही नाचत फिरती
मधुर वाऱ्याच्या संगतीने
फुलांच्या पाकळ्या खुलती

वसंत हा फक्त ऋतू नव्हे
तो जीवनाचा नवा सुवास
त्याच्या स्पर्शाने फुलते सृष्टी
घडतो निसर्गाचा आनंदोत्सव खास

## ती सूर्यकिरणापरी

ती सूर्यकिरणापरी झळाळते
अंधाराशी नेहमीच लढते
ती मातीतून सोनं फुलवते
पुन्हा पुन्हा उठून उभी राहते

ती वाऱ्यासंगे झुलणारी
तरीही पाय रोवून ठेवणारी
ती बेधुंद वाहणारी नदी
पण प्रसंगी प्रचंड लढणारी

तिच्या डोळ्यांत तेज असते
तिच्या मनात दिवा उजळतो
ती प्रेमाने घर फुलवते
आणि जगासाठी दिवा बनते

## जीवनगाणे

जीवन म्हणजे प्रवाह वाहता
कधी सुखाचा, कधी दुःखाचा रस्ता

हसत चालू, रडत नको
संधी मिळेल, थांबू नको

प्रयत्न कर तू, हार मानू नकोस
स्वप्न तुझे सत्य ठरू दे

सुख-दुःखाच्या या खेळामध्ये
स्वतःला हरवू नकोस रे!

## स्वप्नांची वाट

कोणी हसले, कोणी थांबले
तरीही तु चालत रहा!
प्रयत्नांच्या सागरातून
सुवर्ण किनारा गाठत रहा!

सूर्य तसाच उजळत राहतो
तूही तसाच झळकत रहा!
स्वप्नं तुझी तूच रंगव
यशाच्या नभात चमकत रहा!

## माझी ताई

माझी ताई, माझा आधार
सदा लावते जीव अपार
रुसले तरी गोड समजावते
पडले तर हळूच सावरते

हसता हसता खेळून जाते
आईसारखी माया लावते
सुखदुःखाची सोबतीण माझी
ताईशिवाय काहीच नाही

हक्काची ती, आपुलकीची
सावलीसारखी सोबतीची
तिच्या शब्दात जादू असते
दुःखाची रात्र उजळून जाते

ताईसारखी दुसरी नाही
तिच्याशिवाय अर्थ कशात नाही
तुझ्या प्रेमाचा हात मिळावा
सात जन्मी साथ रहावा

## पुढच्या वेळी

पुढच्या वेळी घरी येईन तेव्हा नक्की भेटायला येईन तुला
पण मला मात्र माहित नव्हते पुढची वेळ कधीच मिळणार नाही पुन्हा!
काही अपेक्षा नव्हत्या माझ्याकडून तिला
फक्त एकच अपेक्षा
“डोळे भरून पहायचा आहे पोरी तुला”
डोळे मिटून तू कायमची सोडून गेलीस
आठवणींच ओझं आमच्या मनात साठवून गेलीस.

## मंदिर

मंदिर म्हणजे पवित्र स्थान
आहे हे भक्तीचे धाम
देवळात वाजती सुंदर घंटा
मनात उमटवी भक्तीची छटा

पाय धुवून प्रवेश करावा
मन शुद्ध ठेवून नमस्कार घ्यावा
देव सांगतो –
“सत्कर्म कर रे,
पैसे नको, निर्मळ मन ठेव रे”
स्वच्छतेचा पाठ इथे मिळतो
प्रेमाने वागायला देव शिकवतो
राग, द्वेष दूर सारतो
मदतीला हात पुढे करतो

मंदिर शिकवतं चांगलं राहणं
प्रत्येकासाठी प्रेमाने वागणं
देव असतो मनात सदा
मनी भक्ती ठेव रे
सापडेल सुखी जीवनाची छटा

**ताई....**

आज तुझी खूप आठवण आली
फारसं काही नाही गं, फक्त बेसनाचा लाडू दिसला आणि तुझी आठवण आली...

प्रेमाने स्वतःच्या हाताने बनवलेल्या लाडवाची आठवण मनात दाटून आली..
कोणाला कमी जास्त भेटले याची पर्वा नाही केली
पण भावाला भरगच्च लाडवाचा डबा मिळाला पाहिजे याची काळजी तू घेतली..

ताई..... आज तुझी खूप आठवण आली फारसं काही नाही गं फक्त बेसनाचा लाडू दिसला आणि तुझी आठवण आली..

**सागरकिनारा**

सागराच्या लाटांसारखं
मनही उधाणतं कधी
पडून पुन्हा उठावं
हेच शिकवतात त्या लहरी

रेतीवरचे पायाचे ठसे
उडून जातात क्षणात
पण प्रयत्नांचं स्मरण
राहतं काळाच्या मनात

# सूर्यकिरण

सकाळी लवकर उठतो
सूर्य सोनेरी हसतो
हळूच किरणे येतात
फुलांवर मोती चमकतात

सुगंध दरवळतो बागेत
सप्तरंग फुलतो गगनात
तपत्या ऊन्हात ऊब मिळते
जीवनाला नवी गती गवसते

सूर्यकिरणाची गोडी न्यारी
निसर्गाची सुंदर शाळा भारी
प्रकाशाने मिटतो अंधकार
सूर्य देतो नवा आधार

**बालपण**

गोड गोड हसणं, निरागस ती स्वप्नं
मातीच्या घरट्यात सोनं गवसणं
आईच्या कुशीतली ती शांत झोप
भितीला पळवते
साखरेसारखी गोड गोड गाणी
दुपारी खेळणं, संध्याकाळची कहाणी
रडणंही आपलं आपल्यासाठी असायचं
क्षणात हसून पुन्हा उड्या मारायचं
फुलपाखरांसारखं स्वच्छंद उडणं
ओंजळीत चांदणं अलगद पकडणं
रुसणं, फुगणं, पुन्हा गोड हसणं
खेळताना मातीत लोळणं, धावणं
शाळेचा पहिला दिवस, वह्यांचा सुगंध
बघता-बघता विरून  गेले ते स्वप्नरंग
गोड बालपण, तुझी जादू भारी
मनाच्या कोपऱ्यात ठेवली मी सारी

## गुलाबासारखी तू

गुलाबासारखी नाजूक
काट्यासारखी  मजबूत
सुगंध देणारी तू
सहन करणारी तू

कधी हसतेस फुलासारखी
कधी लढतेस काट्यांसारखी
प्रेमाने रंगलेले तुझे आयुष्य
आशेने सजलेले तुझे स्वप्न

सौंदर्याच्या पलीकडचे तेज तुझे
संघर्षाच्या वाटेवरील धैर्य तुझे
गुलाबाप्रमाणेच तूही
हसत-हसत सारे सोसतेस

## सोबत सखी

जगण्याला दिले कारण
नेहमी दिली साथ
दुःखाच्या काळ्या रात्री
झालीस तू माझा प्रकाश

हसता-हसता रडवलंस
रडता-रडता हसवलंस
जीवनाच्या या प्रवासात
सतत पाठीशी उभी राहिलीस

स्वप्नांना दिली नवी भरारी
बळ दिले तू, पंख पालवी
मनाच्या त्या प्रत्येक वळणावर
तूच झालीस माझी उमंग

आयुष्यभर अशीच राहो
आपली ही गोड मैत्री
जशी तू आहेस तशीच निर्मळ
स्वच्छ आणि नितळ सखी

# अनामिका पांडुरंग सावंत



**जन्म तारीख :** ३१ मार्च २००४

**शिक्षण**

- कुंकळ्ळी युनायटेड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १२ पर्यंत शिक्षण.
- सी. इ. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय कुंकळ्ळी येथील कला शाखेतून पदवी संपादन.
- लेखन व वाचनाची आवड.
- प्रवासाची आवड.

**प्राप्त पारितोषिके**

- इयत्ता बारावीच्या गोवा बोर्डच्या परीक्षेत मराठी विषयात विशेष प्राविण्य प्राप्त केल्याबद्दल गोवा मराठी अकादमी, पणजी - गोवा यांच्याकडून सन्मान.
- दैनिक गोमंतकच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कतर्फे आयोजित करण्यात आलेल्या अखिल गोवा मराठी पुस्तक परीक्षण स्पर्धेत तृतीय पारितोषिक प्राप्त.
- गोवा मराठी अकादमी आयोजित राज्यस्तरीय कविता लेखन स्पर्धेत ‘चहा आणि बरंच काही’ या कवितेला तृतीय पारितोषिक प्राप्त.

पालवी ₹१००/-

9 789334 401592

सी. ई. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय
कुंकळ्ळी, सासष्टी – गोवा